**परिचर्या संवर्गातील ज्या पदांच्या सेवा तांत्रिक किंवा कष्टाच्या स्वरूपाच्या आहेत, अशा पदांचा समावेश तांत्रिक पदामध्ये करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

शासन निर्णय क्रमांक : एनयुआर-२०१८/प्र.क्र.६३/परिचर्या
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार (७ वा मजला),
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : २० जून,२०१९.

**वाचा :**

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मभाप-१०८७/१४/सीआर-२/ ८७/२०, दि.३० डिसेंबर १९८७.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र.मभाप-१०९७/१६५२/ प्र.क्र.७२/९७/२०-ब, दिनांक ७ फेब्रुवारी, २००१.

३) मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्र.मभाप २०१६/प्र.क्र.१३/भाषा-२, दि.२४ मे, २०१६.

४) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.संवैशिवसं/ शा.पत्र.मराठी भाषासुट/५/ई/१९४/२०१८, दि. ०३ जानेवारी २०१९.

**प्रस्तावना :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.३०.१२.१९८७ मधील नियम ४ (I) मधील पोटनियम (पाच) नंतर परंतु मध्ये मराठी विषय उत्तीर्ण होण्याची सूट देण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. उपरोक्त वाचा येथील संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी परिचर्या संवर्गातील विभागीय परिसेविका (गट-क), परिसेविका (गट-क), सार्वजनिक आरोग्य परिसेविका (गट-क), बालरूग्ण परिसेविका (गट-क), मनोरूग्ण परिसेविका (गट-क) व अधिपरिचारीका (गट-क) या पदांच्या सेवा तांत्रिक स्वरूपाच्या असल्याबाबत कळविले आहे. यास्तव सदर पदांना तांत्रिक पदे म्हणून घोषित करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

परिचर्या संवर्गातील खाली नमूद प्रवर्गातील कर्मचारी यांच्या सेवा तांत्रिक स्वरूपाच्या असल्याने त्या पदांना तांत्रिक पदे म्हणून घोषित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | वर्ग | शेरा |
|---|---|---|---|
| १ | विभागीय परिसेविका | वर्ग-३ | तांत्रिक पदे |
| २ | परिसेविका | वर्ग-३ | |
| ३ | सार्वजनिक आरोग्य परिसेविका | वर्ग-३ | |
| ४ | बालरूग्ण परिसेविका | वर्ग-३ | |
| ५ | मनोरूग्ण परिसेविका | वर्ग-३ | |
| ६ | अधिपरिचारिका | वर्ग-३ | |

२. हा शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय मराठी भाषा विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.अनौसं-२०१८/३३/भाषा-२, दिनांक २१.०९.२०१८ अन्वये दिलेल्या अभिप्रायानुसार प्रसिध्द करण्यात येत आहेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०७३११०५२२३१११३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dattatraya Ekanath Ghanavat

Digitally signed by Dattatraya Ekanath Ghanavat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e754dcfc3ad39b1f1ee734fb62ca6c0558ffcae55bba934d42bad451952ab66c, serialNumber=2f161bc485abcbf56c592541f63a01c891a0b9fc64a67387f5d785197f14e51e, cn=Dattatraya Ekanath Ghanavat
Date: 2019.06.20 14:16:09 +05'30'

(द.ए.घनवट)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल-१ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य-१, मुंबई
२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई (३ प्रती)
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५. कक्ष अधिकारी (सेवा-५), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई- ०१.
६. कक्ष अधिकारी (भाषा-२), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७. निवडनस्ती (परिचर्या).